**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**
**महाराष्ट्र शासन उपक्रम (CIN : U40100MH2005SGC153648)**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, धारावी रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.
दुरध्वनी ०२२-२४०७७४४१/४२/४३ website: www.mahagenco.in Email ID- apoclaims@mahagenco.in

---

**क्र. महानिर्मिती/समव्य/मासं-देयके/** 08173 **दिनांक** 6 SEP 2022

## "गतिमान प्रशासन - मानव संसाधन"

## परिपत्रक

**विषय:** महानिर्मिती कंपनीतील सेवानिवृत्त झालेले/ होणारे अधिकारी/कर्मचारी यांच्या अंतिम भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमेबाबत.

**संदर्भ:** म.रा.वी.मंडळ भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ यांचे पत्र क्र. AD/PF/INU/D- ३२१ दि. ०३.०८.२०२२

--------------

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महानिर्मिती कंपनीतून सेवानिवृत्त होणारे अधिकारी/कर्मचारी यांना त्यांची अंतिम भ.नि.नि. ची रक्कम भ.नि.नि. विश्वस्त मंडळाच्या सध्याच्या कार्यपध्दतीनुसार सेवानिवृत्तीनंतर तीन वर्षांपर्यंत जमा ठेवण्याची तरतूद दिलेली आहे. त्यामुळे सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांस सेवानिवृत्तीनंतर तीन वर्षांपर्यंत अंतिम भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमेवर व्याजाची गणना करण्यात येत असते.

त्यामुळे महानिर्मिती कंपनीतून सेवानिवृत्त होणारे बरेचशे अधिकारी/ कर्मचारी त्यांची अंतिम भ.नि.नि. ची शिल्लक रक्कम उचल करीत नाहीत.

तथापि, म.रा.वी. मंडळाच्या भ.नि.नि. विश्वस्त मंडळाने असे सूचित केले आहे की, देशातील गेल्या काही वर्षांपासून व्याजदरात खूप मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे. परंतु, भ.नि.नि. विश्वस्त मंडळाचे व्याजाचे दर अद्यापही खूप मोठ्या प्रमाणात असल्याने सदर व्याजदर विश्वस्त मंडळास तीन वर्षांपर्यंत अंतिम भ.नि.नि. ची रक्कम न काढलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यास देणे अवघड होत आहे, त्यामुळे बऱ्याच मोठ्या प्रमाणात आर्थिक भार कंपनी/ विश्वस्त मंडळावर येत आहे.

करीता, महानिर्मिती कंपनीतील जे अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत व त्यांनी भ.नि.नि. च्या अंतिम प्रदान रक्कमेबाबत दावा केलेला नाही, अशा कर्मचाऱ्यांनी ताबडतोब ऑनलाईन अंतिम भ.नि.नि. चा नमुना भरुन संपूर्ण दस्ताऐवजांसोबत भ.नि.नि. विश्वस्त मंडळाकडे सादर करावा. तसेच, जे अधिकारी/कर्मचारी कंपनीतून ज्या महिन्यात सेवानिवृत्त होणार आहेत, अशा सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांनी ऑनलाईन अंतिम भ.नि.नि. चा नमुना सेवानिवृत्तीच्या महिन्यातच भ.नि.नि. विश्वस्त मंडळाकडे सादर करावा.

तसेच, वर नमूद केल्याप्रमाणे एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याने त्यांचा अंतिम भ.नि.नि. चा नमुना वेळेत न भरल्यास व त्यावर व्याजाची मागणी केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या अधिकारी/कर्मचाऱ्याची राहील. याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सदर परिपत्रक https://esevarth.mahagenco.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सोबत :** वरीलप्रमाणे.

**(भि.य.मंता)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर :**
१) मा. अध्यक्ष, भ.नि.नि. विश्वस्त मंडळ, धारावी, मुंबई-१९.
२) संचालक (संचलन)/(प्रकल्प)/(वित्त)/(खनिकर्म)/(मासं), महानिर्मिती, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, बांद्रा, मुंबई-५१.

**प्रत:**
प्रेषण यादीप्रमाणे.
----सदर परिपत्रक सेवानिवृत्त झालेले/होणारे अधिकारी/कर्मचारी यांच्या निर्देशनास आणून द्यावे.